Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 8TH DECEMBER 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### हुंडेकऱ्यांसंबंधी कायदा सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी हुंडेकऱ्यांसंबंधी कायदा सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९९ चा हुंडेकऱ्यांचा आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो सन १८९९ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

सन १८६५ च्या ३ ऱ्या आक्टांत नवीन कलम १० वें दाखल करणें.

२. सन १८६९ च्या हुंडेकऱ्यांच्या आक्टाच्या ९ व्या कलमानंतर, खालील कलम ज्यास्त दाखल करावें, ह्मणजे:—

हरवल्याबद्दल, नुकसानी झाल्याबद्दल किंवा न पोहोंचविल्याबद्दल, साहा महिन्यांच्या आंत नोटीस दिली पाहिजे.

"१०. जो माल नेण्यासाठीं हुंडेकऱ्याचे स्वाधीन केला असेल तो हरवल्याबद्दल, त्यास नुकसानी झाल्याबद्दल किंवा तो न पोहोंचविल्याबद्दल त्या हुंडेकऱ्यावर फिर्याद करणें ती, प्रसंगाप्रमाणें तो माल हरवल्याची, त्यास नुकसानी झाल्याची किंवा तो न पोहोंचविल्याची नोटीस, ती फिर्याद करण्यापूर्वीं व तो माल हरवल्याबद्दल, त्यास नुकसानी झाल्याबद्दल किंवा तो न पोहोंचविल्याबद्दल वादीस ज्या वेळीं पहिल्यानें कळून आलें त्या वेळापासून साहा महिन्यांचे आंत, त्या हुंडेकऱ्यास देण्यांत आल्याशिवाय करतां कामा नये."

सन १८७७ च्या १५ व्या आक्टाच्या २ ऱ्या परिशिष्टाची सधारणूक.

३. सन १८७७ चा हिंदुस्थानचा मुदतीविषयींचा आक्ट याच्या दुसऱ्या परिशिष्टांत, ३० व्या नंबराची रकम ९ व्या विभागांतून काढून ४ थ्या विभागांत दाखल करावी, आणि त्या परिशिष्टाच्या दुसऱ्या आसनांत माल हरवल्याबद्दलच्या किंवा त्यास नुकसानी झाल्याबद्दलच्या मोबदल्यासाठीं हुंडेकऱ्यावर फिर्याद करण्याच्या मुदतीचीं "दोन वर्षें" या शब्दांच्या ऐवजीं "एक वर्ष" हे शब्द दाखल करावे.

---

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्यावरून, सन १८६९ चा हुंडेकऱ्यांचा आक्ट (सन १८६९ चा ३ रा) यांत एक कलम ज्यास्त दाखल करण्याचें योजिलें आहे व त्या कलमांत असें ठरविलें आहे कीं जो माल नेण्यासाठीं हुंडेकऱ्याचे स्वाधीन केला असेल

तो हरवल्याबद्दल, त्यास नुकसानी झाल्याबद्दल किंवा तो न पोहोंचविल्याबद्दल त्या हुंडेकऱ्यावर फिर्याद करणें ती, ती फिर्याद करण्यापूर्वी व तो माल हरवल्याबद्दल, त्यास नुकसानी झाल्याबद्दल किंवा तो न पोहोंचविल्याबद्दल वादीस ज्या वेळीं समजून आलें त्या वेळापासून साहा महिन्यांच्या आंत त्या हुंडेकऱ्यास नोटीस देण्यांत आल्याशिवाय करतां कामा नये. या मसुद्यावरून आणखी, अशी फिर्याद करण्याची मुदत, फिर्यादींतील माल हरवल्याच्या किंवा त्यास नुकसानी झाल्याच्या वेळेपासून दोन वर्षांची आहे ती कमी करून एक वर्षाची करतां येईल अशा प्रकारें हिंदुस्थानचा मुदतीविषयींचा आक्ट (सन १८७७ चा १९ वा) याचें दुसरें परिशिष्ट सुधारण्याचें योजिलें आहे.

२. हा मसुदा, कित्येक रिव्हर स्टीमर कंपन्यांकडून वेळोवेळीं जे अर्ज करण्यांत आले आहेत व ज्यांचा सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांस हिंदुस्थान सरकारास व स्थानिक सरकारांस फार वेळपर्यंत विचार करावा लागला आहे त्या अर्जांचें फळ होय. ह्या कंपन्यांनीं गेल्या कित्येक वर्षांपासून असा आग्रह धरला आहे कीं, हुंडेकरी या नात्यानें त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्यांपैकीं कित्येक जबाबदाऱ्या त्यांजवर नसाव्या. आरंभीं तकरारीचें मुख्य कारण असें झालें कीं रेलवेंच्या स्टीमबोटींच्या बाबतींत सन १८६५ च्या हुंडेकऱ्यांच्या आक्टाअन्वयेंच्या जबाबदाऱ्या सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबत आक्ट (सन १८९० चा ९ वा) याच्या ८१ व्या कलमावरून माफ करण्यांत आल्या होत्या; परंतु सन १८९६ च्या ९ व्या आक्टावरून सदरहू विशेष ठराव रद्द करण्यांत आल्यामुळें हें तकरारीचें कारण दूर झालें. तथापि दुसरें एक फिर्यादीचें कारण बाकी राहिलें आहे व त्याला कांहीं तरी उपाय योजिला पाहिजे असें हिंदुस्थान सरकारास वाटत आहे. हयगय किंवा अन्यायाची वर्तणूक झालेली नाहीं असें शाबित करण्याचा बोजा सन १८६५ च्या आक्टाच्या ९ व्या कलमावरून हुंडेकऱ्यावर ठेविला आहे; आणि ह्या कंपन्यांच्या स्थितीच्या मनुष्यांनीं जे दावे, त्यांचें कारण घडून आल्यानंतर कदाचित् दोन वर्षांनींहि मांडण्यांत येतात ते दावे अदा करण्यास पात्र असावें हें गैरवाजवी दिसतें, कारण अशा मनुष्यांच्या बचावासाठीं अवश्य असलेला पुरावा म्हटला म्हणजे मुख्यत्वेंकरून नावाडी लोकांच्या जबान्याच असणें जरूर असल्यामुळें व ते नावाडी लोक कधींहि एवढ्या लांब मुदतीपर्यंत नोकरीचा करार करून राहात नसल्यामुळें त्या मनुष्यांना तसा पुरावा मिळविणें अशक्य जरी नसलें तथापि कठीण पडतें. फक्त रिव्हर स्टीमर कंपन्यांच्याच हितासाठीं कायदा करणें रास्त होणार नाहीं म्हणून असा ठराव केला आहे कीं कोणत्याहि हुंडेकऱ्यावर फिर्याद आणण्याचा इरादा असल्याबद्दल वाजवी वेळाच्या आंत नोटीस दिली पाहिजे व अशा बाबतींत मुदतीची इयत्ता कमी करावी. नोटिशींत वेळ किती लिहावा व मुदत किती इयत्तेपर्यंत कमी करावी याबद्दल मतभेद आहे; परंतु हिंदुस्थान सरकारानें या बाबतीचा पुरा विचार करून असा निर्णय केला आहे कीं नोटीस साहा महिन्यांच्या आंत यावी व मुदतीची इयत्ता दोन वर्षांच्या बदला एक वर्षाची करावी.

३. या योजनांच्या योगानें, सदरीं सांगितलेल्या कंपन्यांनीं ज्या ज्या मागण्या केल्या आहेत त्या सर्वांचा निकाल होणार नाहीं हें खरें; परंतु हिंदुस्थान सरकारास असें वाटत आहे कीं या योजनांच्या योगानें, त्यांचें तक्रारीचें सर्व वाजवी कारण दूर होईल.

(सही) एम्. डी. चामर्स.

तारीख २२ माहे आक्टोबर, सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.